## पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी पुणे – १८

### प्राथमिक शिक्षण विभाग

### एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात शाळेंमध्ये बालवाडी शिक्षक भरणेबाबत...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या कालावधीसाठी मराठी,ऊर्दु माध्यमाच्या शाळांमध्ये २१ बालवाडी शिक्षक यांची मानधन तत्वावर ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेसाठी दिनांक ०७/१२/२०२३ ते १५/१२/२०२३ अखेर सकाळी १०.०० ते सांय ५.०० वा.पर्यंत समक्ष अर्ज मागविणेत येत आहेत.

शैक्षणिक अर्हता – बालवाडी शिक्षक एकुण पदे २१

| बाब | एकुण गुण | बालवाडी शिक्षिका शैक्षणिक अर्हता (किमान अर्हता १० उत्तीर्ण) व मान्यता प्राप्त संस्थेचा बालवाडी कोर्स | द्यावयाचे गुण तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| शैक्षणिक अर्हता | ७५ गुणांपर्यंत | एस.एस.सी. | | |
| | | ८०% पेक्षा जास्त | 25 | |
| | | ७०.०१ ते ८०% | 20 | |
| | | ६०.०१ ते ७०% | 15 | |
| | | ५०.०१ ते ६०% | 10 | |
| | | ५०% पेक्षा कमी | 05 | |
| | | एच.एस.सी. | | |
| | | ८०% पेक्षा जास्त | 25 | |
| | | ७०.०१ ते ८०% | 20 | |
| | | ६०.०१ ते ७०% | 15 | |
| | | ५०.०१ ते ६०% | 10 | |
| | | ५०% पेक्षा कमी | 05 | |
| बालवाडी शिक्षिका म्हणुन कमीत कमी ६ महिने ते २ वर्षाचा अनुभव असल्यास | | | 10 | |
| बालवाडी शिक्षिका म्हणुन २ पेक्षा जास्त वर्षाचा अनुभव असल्यास | | | 15 | |

१ बालवाडी शिक्षिका शैक्षणिक अर्हता (किमान अर्हता १० उत्तीर्ण).

२ बालवाडी शिक्षिका म्हणुन कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असावा.

३ बालवाडी सेविका/शिक्षिका म्हणुन ६ महिने किंवा १ वर्षाचा कोर्स असणे आवश्यक.

४ मानधनावर नेमलेल्या बालवाडी शिक्षिकांची नेमणुक ही आदेशाचे दि. / /२० पासून ११ महिने कालवावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात सदरची नियुक्ती असेल. आवश्यकतेनुसार ही मुदत दिलेल्या कालावधीपुर्वी संपुष्टात आणण्याचे मा.अति.आयुक्त (१) सो. पिं.चिं.मनपा यांचा राहील.त्यानंतर सदरचा कालावधी कोणतीही पुर्वसुचना न देता आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही. तसेच नेमणुक संदर्भात न्यायालयात दाद मागणार नाही असे हमी पत्र नियुक्तीवेळी सादर करावे लागेल.

५ उमेदवाराने आपल्या अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला,धारण केलेली शैक्षणिक अर्हता पदवीका व पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक,अनुभव प्रमाणपत्र,तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्राच्या सत्य प्रती सादर करणे बंधनकारक आहे.

६ सदर वालववाडी शिक्षिका यांची एकत्रित मानधन तत्वावर निवड यादी तयार करताना एस.एस.सी.व एच एस सी ८०% पेक्षा जास्त गुण असलेस २५ गुण, एस.एस.सी.व एच एस सी ७० % पेक्षा जास्त गुण असलेस २० गुण एस.एस.सी.व एच एस सी ६०% पेक्षा जास्त गुण असलेस १५ गुण एस.एस.सी.व एच एस सी ५०% पेक्षा जास्त गुण असलेस १० गुण एस.एस.सी.व एच एस सी ५०%पेक्षा कमी गुण

Scanned with OKEN Scanner

**असलेस ५ गुण, बालवाडी शिक्षिका म्हणुन कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असल्यास १० गुण, बालवाडी शिक्षिका म्हणुन २ पेक्षा जास्त वर्षाचा अनुभव असल्यास १५ गुण, इयत्ता १० वी गुण व इयत्ता १२ वी मध्ये पडलेले एकूण गुण एकत्रित करून निवड यादी प्रसिध्द करणेत येईल.** व त्यानुसार नेमणूक देण्यात येईल.

७ ज्या दिवशी प्राथमिक शिक्षण विभागास सदर बालवाडी शिक्षकांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय सदर उमेदवारांची सेवा संपृष्टात आणण्यात येईल. या संबधीचे सर्व अधिकार मा. अतिरिक्त आयुक्त-१ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने राखुन ठेवले आहेत. तसेच पात्र उमेदवारांना नेमणुक देताना शिक्षक संख्या कमी/जास्त करण्याचा अधिकार मा.अति.आयुक्त(१) सो.पिं.चिं.मनपा यांचा राहील.

८ उमेदवाराने सोबत दिलेल्या नमुन्यात बालवाडी शिक्षक या पदासाठी अर्ज मा.अति.आयुक्त(१), पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या नावाने करावा. सदरचा अर्ज दि. १५/११/२०२३ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत समक्ष जुना 'ड' प्रभाग कार्यालय, कर्मवीर भा.पाटील मनपा प्राथ.शाळा,पिंपरीगाव,येथे वेळेत सादर करावा.

९ निवड झालेल्या उमेदवारास एकत्रित मानधना व्यतिरीक्त मनपा मार्फत देण्यात येणाऱ्या कोणत्याही सोयी सुविधा हक्क व इतर आर्थीक लाभ व भत्ते देय राहणार नाहीत. (उदा.दिवाळी बोनस तथा सानुग्रह अनुदान)

१० अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर तसेच नियुक्ती झाल्यानंतरही अर्जदार विहित अर्ज/पात्रता धारण न करणारा,गैरवर्तन करताना दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास संबंधिताची उमेदवारी अथवा निवड रद्द करणेत येईल,तसेच काही आक्षेप आढळल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करणेत येईल.

११ विहीत मुदत काळात प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार कोणत्याही परस्थितीत करणेत येणार नाही.

१२ अर्जदाराने आपले अर्ज महापालिकेच्या जाहीरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील. अन्यथा अर्ज बाद केले जातील.तसेच उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज समक्ष जुना ड प्रभाग येथे प्रत्यक्ष हजर राहुन जमा करावे. इमेल, पोस्टादवारे,किंवा इतर मार्गाने पाठविणेत आलेले अर्ज ग्राहय धरणेत येणार नाही.

१३ अपुर्ण माहिती व अटींची पुर्तता न करणा-या उमेदवाराचे अर्ज बाद करून अपात्र ठरविले जातील. अपात्र अर्ज कार्यालयात जमा करणेत येतील. याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१४ सदरची निवड ही बालवाडी शिक्षक पदासाठी केवळ तात्पुरत्या एकत्रित मानधनावर हंगामी स्वरूपाची आहे. उमेदवारास मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही. सदरचे पद हे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या करीता व आवश्यकतेनुसार राहील.

१५ नियुक्तीच्या वेळी उमेदवारास रक्कम रूपये ५००/- स्टॅम्प पेपरवर (नोटराईज्ड करून) मनपा सेवेत भविष्यात नोकरी बावतचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच न्यायालयात दाद मागणार नाही. यावावतचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल. जाहिरातीनुसार कार्यवाही करणे अथवा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अंतिम निर्णय मा.अति.आयुक्त (१) सो. पिं.चिं.मनपा यांचा राहील.

(प्रदीप जांभळे-पाटील)
अति.आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी पुणे - १८.

जा.क्र.शिक्षण/आस्था/१७/कावि/२८८ /2023
दिनांक- १९/10/2023
जाहिरात क्र.- ०१ /2023

Scanned with OKEN Scanner

## <u>ऊमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना</u>
## मराठी/<u>ऊर्दु</u>

प्रति,

मा. अतिरिक्त आयुक्त ,(१)
प्राथमिक शिक्षण विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे – १८ .

विषय – सन २०२३ – २०२४ या शैक्षणिक वर्षाकरीता एकत्रित तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर नेमणूकीबाबत.

संदर्भ – जाहीरात क्र. ०१ दि.१९/१०/२०२३ प्रसिध्द झालेली जाहिरात.

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात खालील नमुद पदांकरीता आवश्यक ती अर्हता धारण करीत असून सदरच्या पदासाठी निवड होण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

१) माध्यम : [ ] (मराठी/ ऊर्दु )

२) ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे ते पद : [ ] (बालवाडी शिक्षिका)

३) संपूर्ण नाव : [ ] (आडनाव) [ ] (स्वत:चे नाव) [ ] (वडिलांचे/पतीचेनाव)

४) पत्रव्यवहाराचा पत्ता : ______________________________

______________________________ पिनकोड :

५) मो.क्र. : [ ] ई-मेल आय डी: [ ]

६) जन्मतारीख: (दिनांक / महिना / वर्ष) (......./......./१९......) वय : .......वर्षे ..... महिने.

७) लिंग : स्त्री [ ] / पुरुष [ ]

८) जात...............................प्रवर्ग.........................(उदा.अ.जा./अ.ज./खुला,व इतर)

९) ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदासाठीची जाहिरातीनुसार धारण केलेली शैक्षणिक अर्हता:-

| बाब | एकुण गुण | बालवाडी शिक्षिका शैक्षणिक अर्हता (किमान अर्हता १० उत्तीर्ण) व मान्यता प्राप्त संस्थेचा बालवाडी कोर्स | द्यावयाचे गुण तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| शैक्षणिक अर्हता | ७५ गुणांपर्यंत | एस.एस.सी. | | |
| | | ८०% पेक्षा जास्त | 25 | |
| | | ७०.०१ ते ८०% | 20 | |
| | | ६०.०१ ते ७०% | 15 | |
| | | ५०.०१ ते ६०% | 10 | |
| | | ५०% पेक्षा कमी | 05 | |
| | | एच.एस.सी. | | |
| | | ८०% पेक्षा जास्त | 25 | |
| | | ७०.०१ ते ८०% | 20 | |
| | | ६०.०१ ते ७०% | 15 | |
| | | ५०.०१ ते ६०% | 10 | |
| | | ५०% पेक्षा कमी | 05 | |
| बालवाडी शिक्षिका म्हणुन कमीत कमी ६ महिने ते २ वर्षाचा अनुभव असल्यास | | | 10 | |
| बालवाडी शिक्षिका म्हणुन २ पेक्षा जास्त वर्षाचा अनुभव असल्यास | | | 15 | |

Scanned with OKEN Scanner

मी खाली सही करणार प्रमाणित करते/करतो की,वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. तसेच वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे सदरची नियुक्ती तात्काळ रद्द होण्यास मी पात्र राहील. तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

(आपला/आपली विश्वासू )

स्थळ – अर्जदाराची सही______________________

दिनांक - -----/-----/२०२३ अर्जदाराचे नाव______________________

सोबत सहपत्रे– अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेनुसार प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे.

१) ☐ २) ☐ ३) ☐ ४) ☐ ५) ☐ ६) ☐

टिप:- शैक्षणिक व अनुभवाच्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सोबत जोडण्यात याव्या.

Scanned with OKEN Scanner